✓

**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळामार्फत नियतकालिकांच्या प्रकाशनासाठी देण्यात येणारे अनुदान वाढवून देणेबाबत.....**

# मराठी भाषा विभाग

शासन निर्णय क्रमांक : **मसाअ**१०११/ प्र.क्र.७३/२०११/ भाषा-३,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
**दिनांक : १९.०१.२०१२.**

**वाचा-** १) सचिव; महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई, यांचे पत्र क्रमांक: सासंमं २०११/४६३, दिनांक ३० ऑगस्ट, २०११.
२) सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई, यांचे पत्र क्रमांक .सासंमं-२००७/४६८०, दिनांक ३० सप्टेंबर, २०११.

**प्रस्तावना :**

महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभागाच्या अधिपत्याखालील महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ या कार्यालयामार्फत लोकांना उपयुक्त अशी नियतकालिके प्रकाशित केली जातात. परंतु, सदर नियतकालिकांच्या प्रकाशनाच्या खर्चात वाढ झाली असल्याने आता देण्यात येत असलेल्या काही नियतकालिकांच्या अनुदानात रु.१,०००/- ते रु.१०,०००/- ने वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :**

या शासन निर्णयान्वये नियतकालिकांच्या अनुदानात सरासरी रु.१,०००/- ते रु. १०,०००/- पर्यत वाढ करण्याच्या प्रस्तावास पुढील अटी व शर्तीच्या अधीन राहून शासन मान्यता देण्यात आहे.

१. या शासन निर्णयान्वये, वरीलप्रमाणे नियतकालिकांच्या अनुदानात होणारा वाढीव खर्च मंडळाच्या "मागणी क्र. झेड एफ ०२, २२०५ , कला व संस्कृती (००)१०२, कला व संस्कृती प्रचालन, ०१ योजनेत्तर योजना (०१)(०१) राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ (२२०५ ३१७२) - ३१ सहायक अनुदाने (योजनेतर)" या लेखाशिर्षाखाली सन २०११-२०१२ या वर्षात मंजूर करण्यात आलेल्या अनुदानातून व मासिक निधी विवरणपत्राप्रमाणे भागविण्यात यावा.

२. यासाठी सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून त्यांना याबाबतच्या देयकावर स्वाक्षरी करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. हा शासन निर्णय, वित्तीय अधिकार नियमपुस्तिका १९७८, भाग-पहिला, उपविभाग-तीन, अनुक्रमांक-४, परिच्छेद-२७ (२) मधील तरतूदीनुसार प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

( संगणक संकेतांक क्र.२०१२१२१०१६८८(२१e८३३)

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

(ललिता शि. देठे)
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई,
२. सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई,
३. महालेखापाल, महाराष्ट्र - १/२, (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता ), मुंबई, नागपूर,
४. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई,
५. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
६. महालेखाकार (स्थानिक निकाय लेखापरीक्षा व लेखा) महाराष्ट्र , मुंबई,
७. वित्त विभाग/व्यय - ४ , मंत्रालय, मुंबई,
८. **निवड नस्ती (भाषा-३).**